## जगभर हिंडताना... भूलोकीचे नंदनवन.... काश्मीर

काश्मीर म्हणजे भारतातील सर्वात सुंदर निसर्गरम्य स्थळ, स्वदेशातीलच नव्हे तर परदेशातील लोकही हा भूलोकीचा स्वर्ग पाहण्यासाठी येथे येतात. काश्मीरला पोहोचायलाच २-३ दिवस लागतात आणि परतायलाही तेवढेच. खुद्द काश्मीरमध्ये इतकी निसर्गरम्य ठिकाणे आहेत की, सर्व पाहण्यासाठी तिथे कमीत कमी ७-८ दिवस रहायला हवे.

काश्मीर राज्याचे क्षेत्रफळ ८५,८०५ चौ.मैल पसरलेली असून तिचे तीन विभाग आहेत. १.जम्मू २.काश्मीर खोरे ३. लडाख झेलम नदीच्या काठी वसलेले श्रीनगर ही हया राज्याची राजधानी असली तरी हिवाळयात मात्र श्रीनगरची सर्व सरकारी कार्यालये जम्मूला हलवितात.

काश्मीर म्हणजे हिमाच्छादित शिखरे आणि हिरवीगार कुरणे, झेलम-चिनाब सारख्या खळाळणा-या नद्या चित्तथरारक घाटरस्ता, सफरचंदाच्या बागा, केशराचे मळे, आक्रोडच्या लाकडावरील कारागिरी, वुलन कपडयावरील नाजुक भरतकाम, हिमफुलांच्या या प्रदेशात फळाफुलांची रेलचेल आहे. निशान्त शालिमार सारखे मुगल उद्याने, सोनमर्ग, गुलमर्ग, येथील कुरणे, हिमवर्षावाचा अनोखा अनुभव, दललेकमधील हाउसबोटीतील वास्तव्य आणि शिका-यातून केलेले भ्रमण, गुलमर्ग ते खिलनमर्ग रोप-वे किंवा घोडदौड, डकसम, हजरतबल, पहलगम अशा अनेक निसर्गरम्य स्थळांचा हा प्रदेश उगीच म्हटले आहे का, की जन्मा यावे काश्मीर पहावे-

- सौ. ज्योत्स्ना चौधरी

**श्लोक :** कराग्रे वसते लक्ष्मिः करमूले सरस्वति। करमध्ये तु गोविन्दः प्रभाते कर दर्शनम्।। हाताच्या अग्रभागी लक्ष्मी वास करते. अन्मूळ भागी सरस्वती आहे मध्य भागात गोविंद आहे. म्हणून सकाळी उठल्यावर आधी हाताचे दर्शन घ्यावे.

**सुविचार :** कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि शुद्ध चारित्र्य यातून चांगले व्यक्तिमत्व घडते

**म्हणी :** १) नाचता येईना अंगण वाकडे. २) वासरात लंगडी गाय शहाणी

संकलन -सुप्रिया शशिकांत परब- इ.९वी.

## विज्ञानजगत

१. मानवी पेशीतील केंद्रकात किती गुणसूत्रे असतात?
२. हस्तांदोलन केल्यामुळे एडस्चा प्रसार होतो का?
३. सुर्याच्या पृष्ठभागाचे तापमान सुमारे किती अंश सेल्सि. असते?

संकलन -प्रियांका पालांडे- इ.८वी

उत्तरे : १. ४६ गुणसूत्रे २. नाही ३. ६००० अंश सेल्सि.





## इतिहास डोकावताना
### छत्रपती शिवाजी महाराज

या भारतभूमीत एतद्देशीयांचे राज्य असे स्वप्नं पाहणारा आणि सत्यात उतरवणारा युगपुरुष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी, १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला.

प्रवाहाबरोबर जाण्याचे नाकारुन १७व्या शतकात अखंड भारत मुक्तीचे स्वप्नं पाहणारा हा राजा. हिंदुस्थानात स्वतःचे आरमार निर्माण करणारा हा पहिला भारतीय राजा सह्याद्रीच्या उत्तुंग सुळक्यांना तट-बुरुजाची लेणी चढवून अजिंक्य दुर्ग उभारणारा हा दुर्गसम्राट वतनदारी पद्धती बंद करुन सेवकांना सरदारांना रोख पगार देणारा त्या काळातला हा एकमेव राजा स्वतःचे आरमार उभारण्यासाठी स्वतःचे जहाजबांधणी कारखाने उभारणारे दर्यावर्दी शिवाजी महाराज विज्ञानाशी जवळीक साधत. काळावर मात करणारा हा राजा. किती वर्णन करावे त्यासाठी समर्थ रामदासांची प्रतिभाच हवी. समर्थ रामदास स्वामी लिहीतात

शिवरायांचे आठवावे रुप । शिवरायांचा आठवावा प्रताप।
शिवरायांचा आठवावा साक्षेप। भूमंडळी।

अशा या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या सेनाधुरंधराचे ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर निधन झाले.

संकलन-श्रावणी विश्वास शिर्के

## गणित रंजक माहिती

| | |
|---|---|
| एक अंकी लहान संख्या | १ |
| दोन अंकी लहान संख्या | १० |
| तीन अंकी लहान संख्या | १०० |
| चार अंकी लहान संख्या | १००० |
| एक अंकी मोठी संख्या | ९ |
| दोन अकी मोठी संख्या | ९९ |
| तीन अंकी मोठी संख्या | ९९९ |
| चार अंकी मोठी संख्या | ९९९९ |
| १ ते ९ पर्यंतच्या एक अंकी एकुण संख्या | ९ |
| १० ते ९९ पर्यंतच्या दोन अंकी एकुण संख्या | ९० |
| १०० ते ९९९ पर्यतच्या तीन अंकी एकुण संख्या | ९०० |
| १००० ते ९९९९ पर्यंतच्या चार अंकी एकुण संख्या- | ९००० |

संकलन- साक्षी पालांडे इ. ७वी

## स्वच्छतेतून देशसेवेकडे

नमस्कार मुलांनो

आपल्या शाळेचे प्रगतीपर्व हे पहिले मासिक आहे. मग या पहिल्या अंकापासून मी तुम्हांला एक गोष्ट करायला सांगणार आहे आणि मला माहित आहे तुम्ही ती आनंदाने करणार कारण तुम्ही सर्व गुणी मुले आहात.

ऐका तर तुम्हांला शिरिष कुमार माहित आहे ना त्याने खुप लहान असतानाच देशासाठी आपले प्राण दिले. पण तुम्हांला तसलं काही करायचं नाहीय. बंदुकीच्या गोळया अंगावर झेलणं, सीमेवर जाऊन दुश्मनांशी लढणे म्हणजे देशभक्ती असते का? तर नाही आपण आपल्या रोजच्या जगण्यात पण देशाची सेवा करु शकतो. तर कशी ? खुप सोप्पं आहे.

तुम्ही मुलं चॉकलेट खाता, खाऊ खाता त्याची कागदं देता वा-यावर भिरकावून, पेन्सिलीला टोक काढता, कचरा तसाच खाली टाकून देता, वहीची पानं फाडता आणि देता फेकून बोळे करुन.. तर तसं न करता हे सर्व कच-याच्या डब्यातच टाकायचं. इतरत्र कुठेही टाकू नका आणि दुसरे कुणी टाकत असेल तर त्यांना पण नम्रपणे आणि गोड बोलून कच-याच्या डब्यात टाकायला सांगा. असे केल्याने काय होईल आपण ज्या परिसरात राहतो तो परिसर स्वच्छ राहिल. मग कराल हे छोटंसं काम? बघू या आपण सगळे मिळून आपली शाळा आणि आपलं भांडुप स्वच्छ बनवतो का? एवढंसं काम केलंत तरी तुमच्या छोटयांची ती खुप मोठी देशसेवाच असणार आहे.

- सौ. सीमा पवार

### करुन तर पहा..

अंगणात दगड व मातीची छोटीशी टेकडी तयार करा या टेकडीवर झारीने पाणी ओता. पाणी टेकडीवरुन कसे वाहते त्याचे खालील मुद्दयांच्या आधारे निरीक्षण करा.

१. पाणी कोठून कोठे वाहते ?
२. जास्त उतारावर पाणी कसे वाहते ?
३. कोणत्या भागात तळी तयार होतात ?
४. पाणी वाहण्याची दिशा कधी बदलते ?
५. दगडांमुळे अडथळा येतो तेथे काय होते ?

संकलन-सौ. उषा घोसाळकर



चैत्र शु. १९४०

गुढीपाडवा

स्वागत नववर्षाचे, आशा आकांक्षाचे
सुख-समृद्धीचे पडता दारी पाउल गुढीचे

नववर्षाच्या
**हार्दिक शुभेच्छा**

सदर त्रैमासिक प्रगती विद्यामंदीर तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.



प्रगती मंडळ, साईहिल संचालित
प्रगती विद्या मंदीर
सा विद्या या विमुक्तये
नरदास नगर, भांडुप, मुंबई
# प्रगतीपर्व
वर्ष -१ अंक-१ ▌ मार्च-२०१८ (गुढीपाडवा)

## हितगुज....

आपली शाळा प्रगती. प्रगती म्हणजे यश. यशाचे शिखर गाठायचे असेल तर शिक्षणक्षेत्रात अनेक नवनवीन संकल्पना विचारात घेणे आवश्यकच. त्यासाठीचा "प्रगतीपर्व" हा छोटासा प्रयत्न.

शैक्षणिक क्षेत्रातील नवीन संकल्पनेवर आधारित मार्गदर्शन व दिशादर्शन करण्यासाठी "प्रगतीपर्व" विद्यार्थ्यांची अभिरुची व कल लक्षात घेऊन त्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शन करण्याचे महत्वाचे काम या त्रैमासिकाद्वारे साध्य होणार असल्याचा विश्वास वाटतो विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा ध्यास मनाशी ठेऊन आपल्या शाळेमार्फत राबवल्या जाणा-या अनेकविविध प्रकल्पांपैकी प्रगतीपर्व हा एक...

या त्रैमासिकामध्ये भाषा, विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल, शैक्षणिक घडामोडी, मनोरंजन अशा अनेकविविध विषयांच्या माध्यमातून जीवनाकडे बघण्याच्या सकारात्मक दृष्टीकोन अंगी बाणावान व आनंदीवृत्तीने जीवन जगताना सतत कार्यरत राहता येणे हीच प्रगती विद्या मंदीर शाळेतर्फे राबवल्या जाणा-या उपक्रमांची फलश्रृती. हे पसायदान मिळावे हीच विद्येची देवता सरस्वती मातेस विनम्र प्रार्थना.

श्रीम. निलिमा महाजन
मुख्याध्यापिका

### शाळेच्या घडामोडी :

महिला दिनानिमित्त दंतवैद्य डॉ. सौ. एच.एच. आघारकर यांची मुलाखत घेतली.
२००२-०३ बॅचच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन ११ मार्च रोजी संपन्न झाले.
प्रगती शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी कबड्डी प्रशिक्षण आणि संस्कृत वर्ग सुरु आहेत.
शिवजयंती निमित्त स्वप्नील पवार यांच्या गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांच्या प्रदर्शनास विद्यार्थ्यांची भेट.
छंदोमयी या शिवकालीन नाणी व टपाल तिकीटांच्या प्रदर्शनास विद्यार्थ्यांची भेट.
"कै.वि. पाटील गुरुजी" स्मरणार्थ आंतरशालेय कबड्डी स्पर्धा जानेवारी मध्ये संपन्न झाली.
"माझ्या शाळेची प्रगती" या विषयावर शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन केले गेले.